महाराष्ट्र शासन

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शहापूर**

*गणेशवाडी, सावरोलीरोडता.शहापूरजि. ठाणे - ४२१६०१*

**ई-मेल**shahapur__iti@yahoo.co.initi.shahapur@dvet.gov.in**वेब साईट**mumbai.dvet.gov.indvet.gov.inदुरध्वनी.क्र०२५२७- २७०४२२

जा.क्र.औप्रसश/आस्था/२०२३/४७०  दिनांक : ११/ ०८ /२०२३

**विषय** :- कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात “अंतर्गत तक्रार समिती” गठीत करणेबाबत

**संदर्भ** :- १. शासन निर्णय , महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः मकचौ २०१३/प्र.क्र.६३/मकक दिनांक १९ जून, २०१४

२. शासन निर्णय , आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.९३/का.०१ दिनांक १६ जून, २०२३

३. महिला व बाल विकास विभाग शासन परिपत्रक, क्र. मकचौ-२००९/प्र.क्र.१९/मकक दिनांक ४ ऑक्टोबर, २०१०

**प्रस्तावना :-**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी १९९२ च्या रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र.६६६-६७० मधील मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक तत्वे केंद्र शासनाकडून प्रस्तुत करण्यात आली होती, सदर मार्गदर्शक तत्वे ही जोपर्यंत या विषयांबाबत कायदा होत नाही, तोपर्यंत ही मार्गदर्शक तत्वेच कायदा म्हणून शासनावर बंधनकारक राहतील अशी तरतूद उक्त निर्णयामध्ये होती. सदर मार्गदर्शक तत्वे ही विशाखा जजमेंटमधील मार्गदर्शक तत्वे म्हणून प्रसिध्द होती. त्यानुसार प्रत्येक शासकीय/ निमशासकीय कार्यालये / महामंडळे / संस्था इ. ठिकाणी महिला तक्रार निवारण समिती गठित करण्यात येऊन सदर समितीमार्फत लैंगिक छळवणूकीच्या तक्रारींची चौकशी करण्यात येत होती. तथापि आता कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाकडून कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ व दि.९.१२.२०१३ रोजी नियम प्रसिध्द करण्यात आले आहेत. त्यानुसार विशाखा जजमेंटमधील मार्गदर्शक तत्वानुसार गठित करण्यात आलेल्या महिला तक्रार निवारण समित्या सुधारित करण्याचे प्रस्तावित होते.

**कार्यालयीन आदेश :-**

उपरोक्त विषयांच्या संदर्भातील शासन निर्णयान्वये या आस्थापनेतील सर्व महिला कर्मचारी व प्रवेशित, प्रवेश घेणाऱ्या सर्व महिला प्रशिक्षणार्थी यांचे सुरक्षितेबाबत महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध करण्याकरिता अध्यक्ष , राज्य महिला तक्रार निवारण समितीच्या इतिवृतात नमूद केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने वरील शासन निर्णयान्वये महिला तक्रार निवारण समिती गठन

करण्याचे आदेशान्वये या कार्यालयात सदर समितीमध्ये खालील महिला कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांची पुढील आदेशापर्यंत समिती गठीत करण्यात येते आहे.

**१. समितीमधील अध्यक्ष/सदस्यांचे नाव**

| अ.क्र | समितीमधील अध्यक्ष/सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती. सूचित चोरगे (शि. नि) | अध्यक्ष |
| २. | श्रीमती. सुजाता लोखंडे (शि. नि) | सदस्य |
| ३. | श्रीमती. के. ए. पाटकर (शि. नि) | सदस्य |
| ४. | श्रीमती. बी. आर. परदेशी (व.लि) | सदस्य |
| ५. | कुमारी. मुक्ता काशीनाथ म्हशाळ | महिला प्रशिक्षणार्थी |
| ६. | कुमारी. काशिश संतोष कशिवले | महिला प्रशिक्षणार्थी |

**२. सदर महिला तक्रार समितीचे कामकाज पुढीलप्रमाणे चार्लेल:-**

१. केंद्र शासनाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम दिनांक २३ एप्रिल, २०१३ व त्याअंतर्गत दिनांक ०९ डिसेंबर २०१३ रोजी नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. यामधील तरतूदीनुसार महिलांच्या लैंगिक छळवणूकीस आळा घालण्यासाठी व कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

२. संस्थास्तरावर प्राप्त झालेल्या तक्रारीचे निवारण निर्धारीत कालावधीमध्ये छाननी करणे व तक्रारींच्या अनुषंगाने योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करणे.

३. लैंगिक छळवणूकीसारखे प्रकार टाळण्यासाठी जागृती निर्माण करणे व तसेच समितीच्या नियतकालीक बैठका घेऊन सुरक्षित वातावरणाच्या निर्मितीबाबत खात्री करणे.

४. निर्णय घेण्यासाठी सदर समितीच्या सदस्यांपैकी किमान चार सदस्य उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५. सदरहू अधिनियमातील तरतूदीनुसार वार्षिक अहवाल तयार करणे

**प्राचार्य,**
**औ. प्र. संस्था, शहापूर**
**जिल्हा. ठाणे .**

प्रत :-

१. संबंधित कर्मचारी व महिला प्रशिक्षणार्थी

२. गटनिदेशक मार्फत इतरत्र कर्मचारी माहितीस्तव

३. प्रशिक्षण/लेखा/भांडार विभाग

४. सूचनाफलक